# खाद्यतेल उत्पादनातील स्वावलंबनासाठी मधमाशीपालन अनिवार्य

भारताची खाद्यतेलाची वार्षिक गरज २५० लाख टन आहे, तर भारतातील वार्षिक उत्पादन १०० लाख टन आहे. दरवर्षी खाद्यतेलाची आयात १५० लाख टनांवर जाते; इंडोनेशिया आणि मलेशियामधून ९० लाख टन पाम तेल आयात होते. युक्रेन, ब्राझील तसेच अर्जेंटिना येथून सूर्यफूल आणि सोयाबीन तेलाची ६० लाख टन आयात केली जाते. दरवर्षी खाद्यतेलाच्या एकूण आयातीवर ७५००० कोटी रुपये खर्च होतात. (ऑईल पामची कॉम्पॅक्ट लागवड पर्यावरणासाठी हानिकारक आहे, हे देखील या संदर्भात नमूद केले पाहिजे.)

भारतातील विविध पारंपरिक तेलबियांचे प्रति एकर उत्पादन जगाच्या केवळ ४० ते ५०% प्रति एकर आहे. याचे कारण मधमाश्यांद्वारे होणाऱ्या परागीभवनाचे अत्यल्प प्रमाण हेच आहे! मधमाशी ही शेतीमधील सर्वात महत्त्वाची 'सजीव निविष्ठा' आपल्या देशात सतत दुर्लक्षित राहिली आहे.

आपण हळूहळू आयात कशी कमी करावी आणि आपल्या पारंपरिक तेल-बियाणे, डाळी आणि इतर पिकांच्या बाबतीत स्वावलंबी कसे व्हावे, या प्रश्नाचे उत्तर कृषिक्षेत्रात शक्यतोवर सर्वत्र परागीभवनासाठी मधमाशी पालन अंगिकारणे हेच आहे. त्या दृष्टीने शासकीय, संस्थात्मक स्तरांवर अधिकाधिक प्रबोधन व्हावे. शेतकऱ्यांनी 'मधु-प्रशिक्षित' होऊन व्यक्तिगत आणि सामूहिक स्तरावर नियोजनबद्ध प्रयत्न करणेही आवश्यक आहे. आज मधमाशी पालनाच्या संदर्भात योग्य त्या मार्गदर्शनासाठी सक्रिय पुढाकार घेऊन; नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत येथील 'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा'सारख्या आस्थापना जोमाने काम करीत आहेत, याचे समाधान वाटते.

**- डॉ. आर.पी. फडके, पुणे**

---

# ऑईल पाम लागवडीचे दीर्घकालीन दुष्परिणाम ध्यानात घ्यावेत

भारतात खाद्यतेलाची टंचाई आपल्याला दीर्घ काळापासून जाणवते आहे . डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांच्या मार्गदर्शनाखाली नेमलेल्या आयोगाने यावर उपाययोजना करण्यासाठी काही मौलिक सूचना पूर्वी केल्या होत्या. कृषी खात्याने त्या अंमलात आणणे अपेक्षित होते परंतु अंमलबजावणी प्रभावी रीतीने केली नाही व टंचाई तशीच राहिली. आता केंद्र शासनाने तेलाची आयात कमी करून स्वावलंबन मिळविण्यासाठी तेल्या माड (ऑईल पाम) ची मोठ्या प्रमाणात लागवड करण्याची एक महत्त्वाकांक्षी योजना हाती घेतली आहे. शासनाने या प्रश्नाचा सर्वांगीण अभ्यास करून तयार ती केली असेल. परंतु तेल्या माड लागवडीमुळे होणारे दीर्घकालीन दुष्परिणाम अनेक कृषितज्ज्ञांनी आणि पर्यावरणतज्ज्ञांनी मांडले आहेत. ते लक्षात घेणे आवश्यक आहे असे वाटते. विज्ञान भारती व अन्य संस्थांनी याची सर्वंकष चर्चा करून आपले मत शासनापर्यंत पोहोचविले पाहिजे असे वाटते. प्रस्तुत शासकीय योजनेचा पुनर्विचार होणे जरुरीचे आहे.

**- डॉ. क.कृ. क्षीरसागर, पुणे**